उद्योग व कामगार प्रभागातील भारताचे नियंत्रक व महालेखाकार यांचे निरीक्षण अहवाल, कॅग अहवाल इत्यादींवरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापने व लोकलेखा समितीच्या शिफारशींवर त्वरीत कार्यवाही करण्यासाठी नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१०/प्रशासन-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १९ ऑगस्ट, २०१९

वाचा :-शासन पत्र, वित्त विभाग, क्र. भानिम-२०१९/ प्र.क्र. ३०/लोलेस, दि. ०४/०२/२०१९.

प्रस्तावना :-

प्रत्येक कार्यालयाचे लेखापरिक्षण पूर्ण झाल्यावर निष्पत्ती असलेल्या निरीक्षण अहवालावर एक महिन्याच्या आत विभाग प्रमुखांना माहिती सादर करण्यास महालेखापालांकडून विनंती करण्यात येते. तसेच प्रत्येक घटकाचे लेखापरीक्षण पूर्ण झाल्यावर लेखापरिक्षणातील निष्कर्षांवर अहवाल प्राप्त झाल्यापासून सहा आठवड्यात उत्तरे देण्याची विनंती करण्यात येते.

परंतु संबंधित आक्षेपांवर विभागांकडून दिर्घकाळाने महालेखापाल कार्यालयास उत्तरे सादर करण्यात येतात. त्याचप्रमाणे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या अहवालामधील आक्षेपांवरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापन महालेखापालांकडून अधिसंमत करून घेऊन विभागाकडून विहीत मुदतीत लोकलेखा समितीस सादर केली जात नाहीत. सबब, वित्त विभागाने त्यांच्या दि.०४/०२/२०१९ या पत्रान्वये भारताचे नियंत्रक व महालेखाकार यांचे निरीक्षण अहवाल, प्रारूप परिच्छेद, संपादणूक लेखापरीक्षण, कॅग अहवालावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापने व लोकलेखा समितीच्या शिफारशींवर त्वरीत कार्यवाही करण्यासाठी प्रत्येक प्रशासकीय विभागातील एका सहसचिव /उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

परिपत्रक :-

वित्त विभागाने दि.०४/०२/२०१९ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनेनुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातील उद्योग व कामगार प्रभागासाठी खालील उपसचिव यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे:-

डॉ. श्रीकांत पुलकुंडवार, उपसचिव (कामगार)
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
दुरध्वनी क्रमांक : ०२२-२२८१०३८६
भ्रमण दुरध्वनी क्रमांक : ९९६७४१७३३४
ई-मेल आयडी : shrikant.pulkundwar@nic.in

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेताक क्रमांक २०१९०८०८१२२७३३१५१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sumita Mahendra Ghadge

Digitally signed by Sumita Mahendra Ghadge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries, Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bacc8c8aa521f070465113008cf0816c7825b06215959cc413f2efab0b016895, serialNumber=dfc9881e134be9d55005999a5e71c9de64bb4fdfca6582f6bfbb5515930b75ca, cn=Sumita Mahendra Ghadge
Date: 2019.08.19 12:05:32 +05'30'

[सु. म. घाडगे]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव (उद्योग), यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव (कामगार), यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. सह/ उपसचिव (कामगार/ उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. उपसचिव (प्रशासन-१ / प्रशासन-५), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. उपसचिव , लोक लेखा समिती (लोलेस)वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
६. वरिष्ठ उप महालेखाकार, भारतीय लेखापरीक्षा और लेखा विभाग, प्रतिष्ठाभवन, मुंबई २०.
७. सहसंचालक, लेखा व कोषागारे, बरॅक्स, फ्री प्रेस जरनल रोड, मुंबई २०.
८. अवर सचिव / कक्ष अधिकारी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती.